**कृपया प्रसिध्दीसाठी** **28 मार्च 2009**

## श्री. राम नाईक यांच्या पहिल्या प्रचार फेरीस उत्स्फुर्त प्रतिसाद

**मुंबई, शनिवार** : भारतीय जनता पार्टी-शिवसेना व मित्र पक्षांचे उत्तर मुंबई लोकसभा मतदार संघाचे उमेदवार श्री. राम नाईक यांनी आज बोरीवलीतून केलेल्या प्रचाराच्या श्री गणेशाला मतदारांनी प्रचंड प्रतिसाद दिला. गुढीपाडव्याच्या दिवशी **परिवर्तन रथावरुन** आलेल्या श्री. राम नाईक यांच्या भेटीसाठी शेकडो नागरिक आपल्या घरातून खाली उतरले. तर प्रत्यक्ष फेरीमध्ये ही शिवसेना भाजप युतीचे शेकडो कार्यकर्ते, नगरसेवक व ज्येष्ठ पदाधिकारी सामील झाले होते.

1978 मध्ये पहिल्यांदा बोरीवली मधूनच तरुण श्री. राम नाईक आमदार म्हणून निवडून आले. त्यानंतर बोरीवली- दहिसर भाजपा शिवसेना युतीचा जणु अभेद्य गडच बनला. येथील मतदारांनी सातत्याने भाजपाला दिलेल्या समर्थनाची ग्वाहीच या प्रचार फेरीत बघायला मिळत होती. मतदार तर मोठया संख्येने आलेच होते पण आपले आई-वडील व आजी-आजोबा ज्यांना नेहमी मत देतात त्या राम नाईकांना भेटायला ऐन परिक्षेच्या मोसमातही छोटी मुले प्रचार फेरीत आलेली दिसत होती. यावेळी बोलताना श्री. राम नाईक म्हणाले, " एका बोरीवली विधानसभाच्या मतदारसंघाचे आता तीन मतदार संघांमध्ये परिवर्तन झाले आहे. त्यामुळेच पहिल्या निवडणुकीत 89,000 मतांचे मताधिक्य ज्या बोरीवली मतदार संघाने माझ्या पारडयात टाकले त्या मतदारांनी आता विक्रमी मतांनी मला निवडून आणावे अशी माझी विनंती आहे".

भाजपा- मुंबईचे अध्यक्ष व आमदार श्री. गोपाळ शेट्टी यावेळी बोलताना म्हणाले," बोरीवलीकरांसाठी राम नाईक हे नाव घरातले व्यक्तिमत्व आहे. त्याचे प्रतिबिंब येत्या निवडणुकीत आपण कमळावर शिक्का मारुन उमटवूया." शिवसेना विभाग प्रमुख श्री. विनोद घोसाळकर म्हणाले," जो लोकसेवा करतो त्यालाच लोकसभेत पाठवले पाहिजे या भूमिकेतून प्रत्येकवेळी बोरीवली मधल्या मतदारांनी राम नाईक यांना समर्थन दिले आहे. गेल्या निवडणुकीत पराभव झाला असला तरीही त्या निवडणुकीतही या विधानसभा क्षेत्रातून श्री. नाईक यांना लक्षणीय मताधिक्य मिळाले होते. यंदा विक्रमी मतांनी निवडून देऊन आपण इतिहास घडवूया.

एक्सर तलावाहून डि .एन. म्हात्रे रस्ता, योगी नगर, रॉयल कॉम्प्लेक्स, चंदावरकर  रस्ता, रोशन नगर, प्रेम नगर, राजहंस बिल्डिंग, पै नगर, रोकाडिया लेन, चामुंडा सर्कल या मार्गावरुन काढलेल्या प्रचार फेरीत उत्तर मुंबई भाजपाचे अध्यक्ष श्री. योगेश सागर, शिवसेना उप विभाग प्रमुख श्री. विलास पोतनीस, उपमहापौर श्री. विनोद घेडिया, तसेच प्रभाग समिती अध्यक्ष व शिवसेना नगरसेवक श्री. भालचंद्र म्हात्रे, नगरसेवक सर्वश्री प्रकाश कारकर, मोहन मिठबावकर, प्रविण शहा, राम बारोट, शिवकुमार झा व कुमारी भारती केणी आदि जनप्रतिनिधीही सामिल झाले होते.  त्याचप्रमाणे भाजपा मुंबईचे उपाध्यक्ष श्री. जयप्रकाश ठाकुर, सर्वश्री रमेश मेढेकर, अतुल भातखळकर, गणेश खणकर, श्रीकांत पांडे यांच्यासह अनेक भाजपा पदाधिकारी तसेच श्रीमती हंसाबेन देसाई, सर्वश्री हेमंत पाटिल, कर्णा अमिन, बाळकृष्ण, जितेंद्र सरडे , सर्वश्रीमती आशालता ठाकूर, वैशाली बागवे, शुभांगी जाधव, संध्या पारेख, कुमुदबेन शहा, आदि शिवसेना शाखा प्रमुख, महिला शाखा प्रमुख व शिवसैनिक या प्रचारफेरीत मोठया संख्येने सामील झाले होते.

या प्रचार फेरीनंतर शिवसेना विभागप्रमुख श्री. विनोद घोसळकर यांच्या हस्ते दहिसर येथील निवडणूक कार्यालयाचे उद्घाटन झाले.  तेथेही मोठ्या प्रमाणावर कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते.

**(विनोद शेलार)**
**प्रसिध्दि प्रमुख**
**मोबाईल क्र. 9867689540**